औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मंगळवार दि. २८.२.८९ रोजी झालेल्या ३५ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

मंडळाची बैठक गृहनिर्माण भवन, नासिक येथे दिनांक २८.२.८९ रोजी ठरलेल्या वेळी म्हणजे ५ वाजता सुरु झाली परंतु दोनच सदस्य उपस्थित असल्याने इतर सदस्यांना सहभागी होण्याची संधी मिळावी म्हणून बैठक अर्ध्या तासासाठी तहकुब करण्यांत आली व नंतर ५.३० वा. बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली. बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. अ.म. महाजन | उपसभापती औरंगाबाद मंडळ |

बैठकीस खालील सभासद तातडीच्या कामामुळे अनुपस्थीत होते.

| | |
|---|---|
| १] आयुक्त, औरंगाबाद विभाग | सभासद |
| २] आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद. | सभासद |
| ३] उपसंचालक नगर औरंगाबाद | सभासद |

विषय क्रं. १: मंडळाच्या दिनांक ३०.१.८९ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्रं. १४६

मंडळाच्या दिनांक ३०.१.८९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास मान्यता देण्यांत आली व तो कायम करण्यांत आला.

विषय क्रं. २: औरंगाबाद मंडळातील कर्मचा-यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस गृहनिर्माणासाठी भूखंड मिळणे बाबत.

ठराव क्रं. १४७

याविषयावर चर्चा होऊन असे ठरले की, औरंगाबाद मंडळातील कर्मचा-यांच्या तिव्र भावना लक्षात घेऊन इतर मंडळाच्या कर्मचा-यांना भूखंड वाटप करण्यांत आल्याचे समजते, त्याच धर्तीवर औरंगाबाद मंडळाच्या

..२..

कर्मचा-यांना गृहनिर्माणासाठी भूखंड देण्याचा खास बाब म्हणून विचार व्हावा, असा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा.

विषय क्रं. ३: अमृतधाम, नासिक येथील ५४७ अल्प उत्पन्न गट गाळ्यांच्या बांधकामासाठी ठेकेदारास सुरक्षित अग्रीम देणे बाबत.

ठराव क्रं. १४८

याविषयावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, प्राधिकरणाने दिलेल्या सूचना व नियमातील तरतुदी यांच्या आधीन राहून आणि ठेकेदाराने मोक्यावर आणलेल्या मालाची सुरक्षितता राहावी याकरिता आवश्यक ते उपाय योजून योग्य तो सुरक्षित अग्रीम ठेकेदारास देण्यांत यावा.

विषय क्रं. ४: औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत सिडको एन-७, आर-२९ या जागेवरील ५६ गाळ्यांचे बांधकाम करण्यासाठी मागविलेल्या निविदेवर निर्णय घेण्याबाबत.

ठराव क्रं. १४९

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन व निविदा समितीच्या शिफारशी विचारात घेऊन श्री. अंजय्या यांची अंदाजीत किंमतीपेक्षा एक टक्का अधिक दराची निविदा मंजूर करण्यांत आली.

विषय क्रं.५: नगर परिषदेच्या हद्दीत गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करणे बाबत.

ठराव क्रं. १५०

याविषयावर चर्चा करतांना मा.सभापतींनी अशी सूचना केली की, शासनास व प्राधिकरणास माझ्या सहीने पत्र लिहावे व त्या पत्रात असे नमुद करावे की, नगर परिषदेच्या हद्दीमध्ये गृहनिर्माणाची कामे कशाप्रकारे राबविता येतील, त्यासाठी योग्य जागेची निवड, नगरपरिषदांना मार्गदर्शन, इत्यादी प्राथमिक स्वरूपाची कामे करण्यासाठी औरंगाबाद मंडळाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. त्यामुळे स्वतंत्र विभाग [ सेल ] निर्माण करता येत नाही. करिता नगर परिषदेच्या हद्दीत गृहनिर्माणाची कामे तातडीने

..३..

होण्यासाठी एक विशेष कक्ष तयार करण्यांत यावा. या कक्षामध्ये लागणारे कर्मचारी उपलब्ध करण्यांत यावेत व कर्मचा-यांचे वेतन शासनाने अनुदानरूपाने द्यावे. असा प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय घेण्यांत आला.

विषय क्रं. ६: औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या, सिडको भागातील व एकनाथनगर भागातील वसाहतीमधील बाहयसुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

<u>ठराव क्रं. १५१</u>

यां बाब टिप्पणीवर चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की, सिडको भागातील व एकनाथनगर भागातील विविध उत्पन्न गटान्तर्गत असलेल्या योजनेतील आकस्मीक खर्चाच्या तरतुदीतून सिडको व एकनाथनगर या वसाहतीतील रस्ते, दिवे, ड्रेनेज वगैरे दुरूस्तीच्या अत्यावश्यक कामासाठी खर्च करण्यासाठी मंजुरी देण्याबाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच या भागातील बाहय सुविधांचा दर्जा महानगरपालिकेच्या अपेक्षीत दर्जाप्रमाणे सुधारण्यासाठी प्राधिकरणाकडे १४.५० लक्ष रुपयाची मागणी करावी. यासाठी औरंगाबादचा समावेश बाहयसुविधांच्या श्रेणीवाढ कार्यक्रमात करण्यांत यावा अशी शिफारस प्राधिकरणास करण्यांत यावी असा निर्णय घेण्यांत आला.

विषय क्रं. ७: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे न्यायालयीन दैनंदिन कामकाज बघण्यासाठी तसेच तातडीच्या बाबीमध्ये कायदेशीर सल्ला देण्यासाठी खाजगी वकीलाची "रिटेनर" म्हणून नेमणूक करणे बाबत.

<u>ठराव क्रं. १५२:</u>

औरंगाबाद मंडळाचे न्यायालयीन दैनंदिन कामकाज बघण्यासाठी व तातडीच्या बाबीमध्ये कायदेशीर सल्ला देण्यासाठी खाजगी वकीलाची "रिटेनर" म्हणून नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी पाठवावा असे ठरले.

..४..

आयत्यावेळचा विषय

विषय :- लातूर येथे गृहनिर्माण योजनेसाठी जमिन संपादन करणे बाबत.

ठराव क्रं. १५३:

लातूर येथील बाभुळगांव रोड व रिंगरोड लगत सर्व्हे नं. ९७ व ९८ ची लातूर नगरपरिषदेच्या हद्दीला लागून असलेली जमिन संपादन करण्यांत यावी असे ठरले व या जमिनीवर गृहनिर्माण योजना राबविण्या-साठी मागणी अंदाज अजमवितांना नियोजित वसाहतीमधील रस्ते, गटारे इत्यादी बाह्यसुविधांची व्यवस्था भावी गाळेधारकांनी सहकारी संस्था संस्थापून करावी अशी पूर्व अट मागणी आजमावतानाच जाहिरातीत नमुद करावी. व याच संदर्भात मा. सभापती यांच्या सहीने नगराध्यक्ष लातूर यांना पत्र लिहावे असे ठरले.